पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक ०४/०६/२०१९

## मौजा गुंडुरवाहित भव्य जनजागरण मेळावा संपन्न

**> ७०० ते ८०० लोकांची उपस्थिती.**
**> गरजूंना जीवनावश्यक साहित्याचे वाटप.**
**> शासनांच्या विविध योजनांची दिली माहिती.**

जिल्हा पोलीस अधिक्षक, श्री. शैलेश बलकवडे सा़ो. यांच्या संकल्पनेतुन दिनांक ०९ जुन रोजी असणाऱ्या भगवान बिरसा मुंडा यांच्या ११९ व्या पुण्यतिथी निमित्ताने जिल्हा भरात ' भगवान बिरसा मुंडा जनजागरण मेळाव्याचे' आयोजन करण्यात येणार आहे.

या निमित्ताने उपविभागीय पोलीस अधिकारी भामरागड श्री. तानाजी बरडे सा़ो. यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस मदत केंद्र कोठी येथील मौजा गुंडुरवाहित भगवान बिरसा मुंडा भव्य आरोग्य व जनजागरण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर मेळाव्यासाठी ग्रामपंचायत कोठीच्या सरपंच भाग्यश्री लेकामी, आरोग्य सेविका मेश्राम, फॉरेस्ट विभागाचे वाळके, ग्रामसेवक मिना साहेब, सीआरपीएफचे पोलीस निरीक्षक परविंदर साहेब, तसेच ग्रामपंचायतचे इतर सदस्य तसेच पोमके कोठी हद्दीतील ७०० ते ८०० ग्रामस्थ व प्रतिष्ठीत नागरीक अपस्थित होते.

या मेळाव्यात सामान्य व आदिवासी जनतेला शासनाच्या कल्याणकारी योजनेची माहिती देण्यात आली. मेळाव्यात मोफत औषधोपचार, रोजगार, कृषी विषयक माहिती, तसेच जात प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. शिक्षणाचे महत्व, दारु, खर्राचे दुष्परिणाम या बाबत माहिती देण्यात आली. तसेच जेष्ट नागरीक व महिलांचे मेडिकल चेकप करण्यात आले. सदर मेळाव्यात गरजु लोकांना जीवनावश्यक वस्तुंचे वाटप करण्यात आले. अंगणवाडीतील मुलांना पाटी व पेन्सील देण्यात आली. मौजा गुंडूरवाही गावातील गोटुलसाठी आवश्यक साहित्य वाटप करण्यात आले. मौजा मुरुमभुशी येथील युवकांच्या अंगी असणाऱ्या कलागुणांना वाव देण्यासाठी खेळाचे साहित्य देण्यात आले. कार्यक्रमाला उपस्थित नागरीकांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

मेळावा यशस्वीतेसाठी पोलीस मदत केंद्राचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक श्री. रघुनाथ शिंदे, मपोउपनि रागिणी कराळे तसेच पोलीस कर्मचाऱ्यांनी श्रम घेतले.


भव्य


गडचिरोली जिल्हा पोलिस प्रशासनाच्या वतीने
भव्य